परिपत्रक क्रमांक 261

1983 मध्ये कार्याभ्यास गटाने बृहन्मुंबई विभाग मुंबई व पुणे कार्यालयांच्या हिशोबाच्या पत्रकांची छाननी केली तेव्हा असे आढळून आले होते की, हिशोबाची पत्रके तपासण्याचे कामी न्यासांचे उद्देश व स्वरुप विचारात घ्यावे लागतात व त्यामुळे त्यांची अशी शिफारस केली आहे की, त्रोटक स्वरुपात न्यासाचे उद्देश अंशदान पुस्तकांत पण लिहीले जावेत. न्यासाचे तपशीलवार उद्देश शेडयूल-1 वरुन व डिरेक्टरी वरुन कळू शकतात. कार्याभ्यास गटाने केलेली शिफारस अंशात्मक स्वरुपात मान्य धरण्यात येऊन खालील प्रकारच्या सूचना देण्यात येत आहेत :-

अंशदान पुस्तकात सुरुवातीला न्यासाचे नांव व पत्ता असतो व त्याचे डाव्या बाजूकडील उपलब्ध असलेल्या थोडयाश्या रिकाम्या जागेत यापुढे खालील पैकी कोणत्याही एक प्रकाराचा खुलासा नोंद व्हावा.

न्यासाचे उद्देश मिश्रीत आहेत/न्यासाचे उद्देश्र पूर्णतया शैक्षणिक आहेत/न्यासाचे उद्देश पूर्णतया वैद्यकीय आहेत/न्यासाचे उद्देश पूर्णतया शैक्षणिक व वैद्यकीय आहेत.

सर्व विभागीय कार्यालयांच्या अधिकाऱ्यांनी वरील सूचना त्वरित अंमलात आणाव्यात.

मा.मु.टुले,
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य,मुंबई.

दिनांक :-

प्रत :-

1. धर्मादाय सह आयुक्त, पुणे-सोलापूर/औरंगाबाद-जालना/नागपूर-भंडारा
2. धर्मादाय उप आयुक्त, बृहन्मुंबई विभाग/कोल्हापूर
3. सहायक धर्मादाय आयुक्त, सांगली,सातारा/ रत्नागिरी/सिंधुदुर्ग/ठाणे/ रायगड/नाशिक/अहमदनगर/जळगांव/धुळे/परभणी-नांदेडलातूर-बीड/ उस्मानाबाद/अमरावती-वर्धा/चंद्रपूर-यवतमाळ/गडचिरोली/अकोला/ बुलढाणा.
4. धर्मादाय आयुक्त,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे कार्यालयांतील आस्थापना शाखेस माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.